

मॉहीयांग गावातील 'चाकावर शेती'चा पुढाकार

आर्थिक मंदीच्या विरुद्ध आदिवासी शेतकऱ्यांना भक्कमपणे उभे करण्यासाठी : स्वयंसहायता ही एक सर्वोत्तम मदत

Janak Preet Singh

फार्म ऑन व्हील्स (चाकावर शेती) या उपक्रमांतर्गत स्थानिक उत्पादनांची विक्री करण्याच्या पुढाकाराने शेतकरी गट विकेंद्रित पद्धतीने स्थानिक बाजारपेठांमध्ये प्रवेश करू शकले आहेत. मेघालयातील नेसफास संस्थेच्या सहकार्याने स्थानिक शेतकऱ्यांनी केलेल्या या पुढाकारातून इतर सर्व शेतकरी गटांसाठी एक आदर्श ठेवला आहे आणि ते त्यास अनुकूल बनवून आपल्या क्षेत्रात पुढे नेतील यासाठी प्रोत्साहित केले जात आहे.

संपूर्ण जगाला जागतिक कोविड महामारीचा तडाखा बसलेला आहे. यामध्ये सर्वच होरपळल्या जात असून वेगवेगळ्या प्रदेशांवर याचा गंभीर परिणाम होत आहे. कोविड-१९ च्या प्रभावामुळे जगातील अर्थव्यवस्था विस्कळीत झाली असून परिणामी अर्थव्यवस्थेतील समृद्धीसाठी आवश्यक आधारभूत भांडवला अभावी विशेषत: लहान शेतकरी असुरक्षित झालेले आहेत. नियमित बाजारपेठा बंद होणे आणि सरकारी नियमांना अधीन राहून काही आंशिक कामकाज सुरू असल्याने बऱ्याच लोकांना मोठी आर्थिक अडचण झाली आहे. हे असे असले तरी स्वनिर्भर आदिवासी शेतकऱ्यांना त्रास झाला नाही. त्यांनी या काळातील आवाहनांचा प्रतिकार केला. नेसफास NESFAS (The North East Slow Food and Agrobiodiversity Society) या संस्थेच्या पाठिंब्याने या संकटावर मात करण्यासाठी नवीन उपाय शोधून काढले आहे. नेसफास ही मेघालयाची राजधानी शिलाँग येथे मुख्यालय असलेली एक प्रसिद्ध संस्था आहे. जी ईशान्य भारतातील स्वदेशी खाद्यप्रणालीचा प्रचार, संरक्षण आणि पुनरुज्जीवन करण्याचे काम करते.

नेसफास मेघालय आणि नागालँडच्या १३० खेड्यांमध्ये कार्यरत आहे आणि सद्य ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ (आरईसी) फाउंडेशन द्वारा अनुदानित अन्न जैवविविधता, पोषण आणि ऊर्जा सुरक्षिततेत कोणीही मागे राहू नये या उद्देशाने ३००० कुटुंबासाठी प्रकल्प राबवित आहे. नेसफेस ३२४९ शेतकऱ्यांमध्ये गुंतलेले आहे. प्रामुख्याने त्यात आदिवासी महिला अल्पभूधारक शेतकरी आहेत. जे बहुधा (झूम शेती) शिफ्टिंग शेती करतात. त्यातील काही जण भात आणि बन किंवा छतावरील लागवडीसारख्या स्थायिक शेती करीत आहेत. हे शेतकरी वडिलोपार्जित स्थानिक बियाणांचे जतन करीत आहे. स्थानिक बियाणे हळूहळू नष्ट होत असले तरी त्या बियाणांचे विनिमय कार्यक्रम आणि समुदाय पातळीवर बियाणे बँक स्थापना करणे यासारख्या उपक्रमांच्या सहाय्याने त्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.

हे शेतकरी सहसा साप्ताहिक स्थानिक बाजारात त्यांचे उत्पादन विकतात. काही एखादी छोटीशी जागा भाड्याने घेतात तर काही तात्पुरती व्यवस्था करून व रस्त्याच्या कडेला दुकान मांडून आपले उत्पादन विकतात. तसेच त्याच्याकडे येणाऱ्या व्यापाऱ्यांना सुद्धा ते त्यांचे उत्पादित धान्य विकतात. तथापि या कोविड-१९ मुळे विक्रीच्या या सर्वच मार्गावर अत्याधिक विपरीत परिणाम झालेला आहे.

नियमित बाजार व्यवहारात निर्माण झालेल्या अडचणीवर मात करण्यासाठी आणि रोजीरोटीच्या आव्हानांवर मात करण्यासाठी स्थानिक उपायांपैकी एक म्हणजे 'फार्म ऑन व्हील्स' चाकावर शेती नावाचा उपक्रम शेतकरी गटांना त्यांचे उत्पादन थेट ग्राहकांना विकण्यासाठी एक नवीन मार्ग व व्यवस्था बनली आहे. यातून त्यांच्या स्वत:साठी टिकावू उपजीविकेची संधी निर्माण होऊ शकली आहे.

खरं तर, 'फार्म ऑन व्हील्स' हे अक्षरश: एक वाहन होय. जे शेतकरी गट आठवड्यातून एकदा किंवा उत्पादन तयार होते तेव्हा ताजे उत्पादन विकण्यासाठी भाड्याने घेतात आणि आपले उत्पादन विकतात. या कार्यक्रमामध्ये मेघालयाच्या विविध जिल्ह्यांमधील ३० शेतकरी गटे म्हणजेच सुमारे २०० शेतकरी गटे म्हणजेच सुमारे २०० शेतकरी सामील झालेले आहेत. सद्य - अद्याप कोणत्याही शेतकरी गटांकडे स्वत:चे वाहन नाही. परंतु भविष्यात आपला गट बचतीतून 'फार्म ऑन व्हील्स' या उपक्रमासाठी स्वत:ची वाहन खरेदी करण्याची योजना आहे. सहसा 'फार्म ऑन व्हील्स' हा उपक्रम आठवड्यातून दोनदा असतो आणि त्याची योजना ही बाजाराच्या दिवसानुसार गटातील शेतकरी तयार करतात. खर्चात बचत करण्यासाठी म्हणून प्रत्येक गटातून केवळ १ किंवा २ शेतकरी विक्रीसाठी वाहनासोबत असतात. नेसफास संस्थेने या शेतकरी गटांना प्रचारात्मक साहित्य, बियाण्यांच्या पुरवठ्यासह काही प्रमाणात आर्थिक मदत सुद्धा पुरविली. तसेच या सर्व जमाखर्च व्यवहाराचा हिशेब राखण्यासाठी प्रशिक्षण सुद्धा देण्यात आले आहे. खरं तर, हे लहान प्रमाणावरील आदिवासी शेतकरी विविध प्रकारचे उत्पादन घेतात. त्यातील काही उत्पादने जंगलातून सुद्धा संकलित केलेली असतात. विक्रीसाठी आणल्या जाणाऱ्या उत्पादनांमध्ये विविध प्रकारचे वन्य खाद्य तसेच शेतकऱ्यांची पिकविलेले बटाटे, गाजर, सोयाबीन आणि इतर हंगामी भाज्या, फळे आणि डाळी यासारख्या भाजीपाल्यांचा समावेश असतो. कोविड-१९ विरुद्ध आपला जो लढा आहे त्यासाठी नेसफास संस्थेसंबंधित शेतकरी गट 'फार्म ऑन व्हील्स' या माध्यमातून घरगुती अन्न सुरक्षा व उदरनिर्वाहाचे पालनपोषण तसेच चांगल्या प्रतिकार शक्तीसाठी पोषक-समृद्ध अन्न पुरवित आहेत. कोविड काळातील नियमांचे पालन करणे शक्य होत असल्याने शेतकरी स्थानिक बाजारातही विक्री करीत आहेत. या उपक्रमाचे उद्दिष्ट म्हणजे शारीरिक अंतरांच्या निकषांचे पालन करीत व्यवसायांना कार्य करण्याची परवानगी देणे आणि प्रत्यक्षात बाजारपेठेतील ग्राहकांपर्यंत उत्पादन पोहचवणे होय. याद्वारा घरगुती अन्नसुरक्षेचे रक्षण करण्याची तातडीची गरज आणि त्यांची स्थानिक उत्पादनांची खरेदी-विक्री करण्याची क्षमता देखील सुनिश्चित करते.

तथापि, 'फार्म ऑन व्हील्स' उपक्रमातील शेतकऱ्यांची व्यापार करण्यायोग्य प्रमाणात संख्या असण्याचे आव्हान त्यांच्या पुढे आहे. कारण बहुतेक अल्पभूधारक शेतकरी मर्यादित प्रमाणात आहेत आणि ते फक्त त्यांच्याकडे अतिरिक्त असलेल्याच वस्तू विकतात. त्यांच्या सर्वांच्या उत्पादनाचे एकत्रीकरणा नंतरही ते प्रमाण त्यांच्या बाजारपेठेच्या मागणीच्या तुलनेत मर्यादित असल्याचेच जाणवते.



दरिचि ग्रे येथील राजे बी. मारक या शेतकऱ्याची पोषण बाग

नेसफास संस्थेच्या सहकार्याने सुरू असलेल्या 'फार्म ऑन व्हील्स' या उपक्रमाने मेघालयात काम करणाऱ्या इतर सर्व शेतकरी गटांसाठी एक उदाहरण ठेवले आहे आणि त्यास अनुकूल बनवून त्यांना आपल्या क्षेत्रात पुढे नेण्यास प्रोत्साहित केले आहे. मेघालयातील पश्चिम जैंटिया हिल्समधील 'फार्म ऑन व्हील' या उपक्रमा व्यतिरिक्त सोसायटी फॉर अर्बन ॲण्ड रूरल एम्पॅवरमेंट (SURE) च्या मदतीने https:svllad.com/store ही वेबसाईट ऑनलाईन विक्रीसाठी स्थानिक प्लॅटफॉर्म उपलब्ध झाल्याने शेतकरी आणि ग्राहकांमधील दरी कमी झाली. ज्यामुळे भाजीपाला विक्री ऑनलाईन करता येणे शक्य झाले आहे.



मुखाण येथे बियाणांची देवाण-घेवाण

नेसफास संस्थेची भागीदार स्वयंसेवी संस्था, सोसायटी फॉर अर्बन ॲण्ड रूरल एम्पॉवरमेंट (SURE) शेतकरी गट आणि ऑनलाईन विक्री उपक्रमात प्रक्रियात्मक समन्वयन कार्य करते. (SURE) ही संस्था उपलब्ध असणाऱ्या उत्पादनाबाबत विक्रीची सूचना संकेतस्थळावर पोहचविण्याचे आणि शेतकऱ्यांकडून उत्पादित माल खरेदी करण्यासाठी ग्राहकांना मदत करते. या भागीदारीमुळे शहरी आणि ग्रामीण भागातील समुदायातील सदस्यांच्या घरात वस्तू पोचविण्यास मदत झाली आहे. आता शेतकरी उत्पादन वाढविण्यासाठी त्यांच्या स्वयंपाक घरामागील बागांमध्ये किंवा घरच्या बागांमध्ये स्थानिक निरोगी उत्पादनांची अतिरिक्त लागवड करण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि समुदायातील इतर गरजू सदस्यांनाही स्थानिक बियाणांचे वितरण करीत आहेत.

गारो हिल्समध्ये स्थानिक शेतकरी गटांनी समुदायातील विविध सदस्यांना स्वयंपाक घरामागच्या बागांची आवश्यकता पटवून दिली आहे. ते कोविड-१९ विषाणूविरुद्ध लढाईत चांगल्या प्रतिकार शक्तीसाठी स्वच्छ, स्थानिक आणि पौष्टिक समृद्ध अन्न तसेच घरगुती अन्न सुरक्षा आणि उदरनिर्वाहाचे पालनपोषण करणे यावर भर देत आहेत. कोविड-१९ च्या प्रभावाने एक प्रकारे आपल्याला अन्न आणि रोजीरोटीसाठी स्थानिक विविधतेवर अवलंबून असण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. स्थानिक शेतकऱ्यांना स्वावलंबन व आत्मनिर्भरतेसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यास सक्षम बनवले आहे. आदिवासी शेतकऱ्यांकडून नेहमीच स्थानिक शेतकऱ्यांच्या स्वावलंबन व आत्मनिर्भरतेची बाजू मांडल्या गेली आहे. परंतु उत्पादन केंद्रित औद्योगिक कृषी व्यवस्थेच्या काळात या बाबीचे महत्त्व आपण गमावले आहे.

Janak Preet Singh,
Senier Associate, Livelihoods NSSFAS, Shillong,
E-mail : janak.nesfas@gmail.com

मराठी अनुवाद : प्रा. डॉ. केशव मा. वाळके, स. प्रा. देविदास शंभरकर

Source : Self help is the best help Indigenous farmer stand strong against economic slowdown ,LEISA India December, 2020.

LEISA INDIA Language Editions



Kannada, Telugu, Tamil, Oriya, Hindi, Marathi and Punjabi